# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

गृह मंत्रालयाने २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वुर राणा प्रकरणात नरेंद्र मान यांची तीन वर्षांसाठी विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राणाच्या प्रत्यार्पणासाठीचा अंतिम अर्ज फेटाळल्यानंतर राणा याला भारतात आणलं जात आहे. या घटनेमुळे हल्ल्यातल्या न्याय प्रक्रियेला नवसंजीवनी मिळण्याची शक्यता आहे.

****

जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या.

भगवान महावीर यांचं जन्मस्थान असलेल्या बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातल्या कुंडलपूरमध्ये शोभायात्रा, मस्तकाभिषेक आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीर यांचं जन्म कल्याणक पर्व सर्वांच्या आयुष्यात सुख, शांती, समृद्धी घेऊन येवो, त्यांचं जीवन समाजाला सदैव प्रेरणा देत राहो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं जैन समाजाच्या वतीने पैठण गेट परिसरातून गुलमंडीमार्गे मिरवणूक काढण्यात आली, नागरिकांनी ठिकठिकाणी मिरवणुकीचं स्वागत केलं. शहरातल्या अनेक जैन मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

अकोला शहरात जैन समाजाच्या वतीने मिरवणुक काढण्यात आली. या शोभायात्रेची सुरुवात अकोल्यातल्या प्राचीन जैन मंदिरापासून ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात झाली.

नागपूर इथं श्री दिगंबर जैन परिवार मंदिर ट्रस्ट आणि सकल जैन समाजाच्या संयुक्त विद्यमाने भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

****

जागतिक होमिओपॅथी दिन आज साजरा केला जात आहे. होमिओपॅथी ही आरोग्य सेवेसाठी समग्र दृष्टिकोन ठेवणारी जगातील दुसरी – सर्वात मोठी वैद्यकीय प्रणाली असून, त्यातील नैसर्गिक, अनाक्रमक पद्धतींमुळे लोक हे उपचार पसंत करतात. आयुष मंत्रालयाच्या मते, देशात १० कोटींहून अधिक लोक आरोग्याच्या गरजांसाठी होमिओपॅथीवर विश्वास ठेवतात.

परभणी जिल्ह्यातल्या सेलू इथं होमिओपॅथी दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त आरोग्य शिबिराच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी आणि औषधी वाटप करण्यात आलं. नागरिकांचा याला चांगला प्रतिसाद मिळाला

****

राज्य मार्ग परिवहन – एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेल्या नियम आणि आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची “लोकवाहिनी” असलेल्या एसटीला भविष्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम करून एक चांगली दर्जेदार परिवहन सेवा निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचं, सरनाईक यांनी म्हटलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या वाशी इथं शासकीय आय टी आय साठी जागा देण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तातडीने पाठवावा, त्याला तत्काळ मंजुरी देण्यात येईल, असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. मुंबईत काल यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. आमदार राणा जगजितसिंह पाटील यावेळी उपस्थित होते. आयटीआय साठी वाशीपासून दहा किलोमीटर अंतरावर तेरखेडा गाव परिसरात जागा देण्याचं प्रस्तावित असून, यासाठी वन विभागाची परवानगी आवश्यक असल्याची माहिती जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी यावेळी दिली.

****

नागरिकांमध्ये जलसाक्षरता वाढवणं, पाण्याच्या बचतीचं महत्व पटवून देणं आणि जल व्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबवणं, यासाठी जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल या कालावधीत ‘जलव्यवस्थापन कृती पंधरवडा’ साजरा

केला जाणार आहे. समाजात पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत जनजागृती वाढवण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. याअंतर्गत शेतकरी – पाणी वापर संस्था संवाद, कालवा पाहणी, उपसा सिंचनाची पाणी परवानगी देण्यासाठी तक्रारींचं निरसन, पाण्याच्या नियोजनाबाबत कार्यशाळा, महिला मेळावा आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

****

रत्नागिरीत काल झालेल्या गुंतवणूक परिषदेत स्थानिक उद्योजकांनी राज्य शासनाबरोबर जिल्ह्यात एक हजार ३७ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याबाबत सामंजस्य करार केले. उमेद प्रकल्पांतर्गत चिपळूणचा अन्न आणि फळप्रक्रिया क्लस्टर, तसंच वस्त्रोद्योग क्लस्टर आणि दापोलीचा मत्स्यप्रक्रिया क्लस्टर या महिला बचत गटांच्या तीन औद्योगिक समूहांकरता १५ लाख रुपयांचा निधी यावेळी वितरित करण्यात आला. या तीन औद्योगिक समूहांसोबत दहा कोटी रुपयांचे सामंजस्य करारही करण्यात आले. या परिषदेला बँकर्स, गुंतवणूकदार, उद्योजक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

चीनच्या निंगबो इथं सुरू असलेल्या आशियाई अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांनी मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आज झालेल्या उप-उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात या भारतीय जोडीने चायनीज तैपेईच्या जोडीचा १२-२१, २१-१६, २१-१८ असा पराभव केला.

****

इंडियन प्रिमियर लीग – आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. बंगळुरु इथं होणारा हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

****